**ठळक बातम्या**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांना देशभरातून आदरांजली

- स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या परीक्षा लवकरच २२ भारतीय भाषांमध्ये होणार

- बुलडाणा जिल्ह्यात झालेल्या अपघात ५ जणांचा मृत्यू, ५ जण जखमी

**आणि**

- आशियाई स्पर्धांमध्ये टेबल टेनिस महिला दुहेरीतल्या ऐतिहासिक कांस्य पदकासह भारतीय खेळाडूंना आज ३ कांस्य पदकांची कमाई

**<><><><><><>**

देशभरात आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली जात आहे. यानिमित्त देशासह जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत.

नवी दिल्लीत महात्मा गांधी यांच्या राजघाट या समाधीस्थळी आज सर्वधर्म प्रार्थना झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी राजघाट इथं जाऊन पुष्पांजली अर्पण केली. याशिवाय लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि विरोधी पक्ष नेत्यांनी देखील बापूजींना आदरांजली वाहिली. महात्मा गांधी यांच्या सत्य आणि अहिंसा या आदर्शांनी जगाला एक नवीन मार्ग दाखवला असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. तर स्वातंत्र्य आणि समानतेसाठी गांधीजींनी केलेला पाठपुरावा आज देखील दीपस्तंभासारखा अढळ आहे, असं

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. महात्मा गांधी यांची कालातीत शिकवण आपला मार्ग प्रकाशमय करत आहे, त्यांचा प्रभाव जागतिक असून तो संपूर्ण मानवजातीला एकता आणि करुणेची भावना पुढे नेण्यासाठी प्रेरित करतो. त्यांच्या स्वप्नातला भारत साकारण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहूया, असा संदेश प्रधानमंत्र्यांनी दिला आहे.

माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांचीही आज 119 वी जयंती आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी विजय घाटावर जाऊन लालबहादूर शास्त्री यांना श्रद्धांजली वाहिली. लाल बहादूर शास्त्री यांचा साधेपणा, राष्ट्राप्रती समर्पण आणि 'जय जवान, जय किसान' ही ऐतिहासिक साद आजही येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणादायी ठरत आहे. भारताच्या प्रगतीसाठीची त्यांची अतूट बांधिलकी आणि आव्हानात्मक काळातलं त्यांचं नेतृत्व अनुकरणीय आहे, अशा शब्दात प्रधानमंत्र्यांनी आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><><>**

स्वच्छता आणि सरकारी कार्यालयातील प्रलंबित कामांचा निपटारा यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या  एका विशेष मोहीमेचा तिसरा टप्पा आजपासून सुरु होत आहे. महात्मा गांधी यांच्या जयंतीचं औचित्य साधून सुरु केलेल्या या मोहिमेचा कालावधी  येत्या ३१ तारखेपर्यंत आहे. गेल्या दोन वर्षात अशा प्रकारच्या दोन विशेष मोहिमा आखल्या होत्या. या अंतर्गत सरकारी कार्यालयांमध्ये वापर होत नसलेली सुमारे ९० लाख चौरस फूट जागा मोकळी करण्यात आली आणि त्या जागेचा उत्पादकतेच्या दृष्टीनं योग्य वापर करण्यात आला अशी माहिती केंद्रीय कार्मिक, तक्रार निवारण आणि निवृत्तीवेतन मंत्रालयानं दिली आहे. याशिवाय भंगार

साहित्याच्या विक्रीतून केंद्र सरकारला ३७० कोटी रुपये मिळाले तर ४ लाख ५६ हजार तक्रारींचं निवारण करण्यात आलं.

या मोहिमेअंतर्गत राज्यात विविध ठिकाणी साफ सफाई मोहिमेचं आयोजन करण्यात आलं होतं. आकाशवाणी मुंबईच्या कार्यालयातही विविध विभागातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिसराची स्वच्छता केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल राष्ट्रीय हळद मंडळाची घोषणा केली. पुरवठा साखळीपासून पायाभूत सुविधांपर्यंत विविध क्षेत्रात हे मंडळ शेतकऱ्यांना मदत करेल. हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या क्षमतांचा विकास आणि त्यांना मदत करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

स्टाफ सिलेक्शन कमिशन अर्थात कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षा लवकरच २२ भारतीय भाषांमध्ये घेतल्या जातील, अशी घोषणा केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी काल केली. सर्व भाषिक उमेदवारांना एकसमान संधी मिळावी ही सरकारची इच्छा असल्याचं ते म्हणाले. नवी दिल्लीत आयोजित भारतीय भाषा परिषदेत ते बोलत होते. यावर्षीपासून या परीक्षा हिंदी आणि इंग्रजीसह एकूण १३ भाषांमध्ये होतात. जेईई, नीट आणि युजीसीच्या परीक्षाही१२ भारतीय भाषांमधून घेतल्या जातात, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

येत्या तीन ते चार वर्षात जगातलं सर्वात मोठं  वाहनउद्योग केंद्र बनण्याचं भारताचं उद्दिष्ट आहे, असं केंद्रीय वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते काल प्राग इथं झेक प्रजासत्ताकमधल्या भारतीय समुदायाशी संवाद

साधत होते. गेल्या नऊ वर्षात, वाहन उद्योगाची उलाढाल साडे चार लाख कोटी रुपयांवरून साडे बारा लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे, तसंच या उद्योगानं देशातल्या युवा वर्गासाठी साडे चार कोटी रोजगार निर्मिती केली आहे, असं गडकरी म्हणाले.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात नांदुरा नजीक मजुरांना घेऊन जाणाऱ्या मिनी ट्रकला आज पहाटे अपघात होऊन पाच जण जागीच ठार झाले. तर इतर पाच जखमी झाले. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ जवळ वडनेर भोलजी फाट्याजवळ हा अपघात झाला. हे मजूर परप्रांतीय होते.

<><><><><>

दिल्ली पोलिसांनी आज एका दहशतवाद्याला अटक केली असून तो पुण्यातल्या आयसिस संघटनेशी संबंधित होता. या दहशतवाद्याचं नाव राष्ट्रीय तपास संस्थेच्या फरार यादीत होतं आणि त्याच्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस होतं. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकानं या संघटनेच्या इतर काही दहशतवाद्यांनाही ताब्यात घेतलं आहे. परदेशातल्या खबऱ्यांच्या माहितीच्या आधारे उत्तर भारतात दहशतवादी कारवाया घडवण्याचा या सर्वांचा कट होता. पोलिसांनी त्यांच्याकडून गुन्हेगारी साहित्य आणि स्फोटकांसाठी लागणारा दारुगोळा हस्तगत केला.

<><><><><>

सीबीआय अर्थात केंद्रीय तपास पथकानं मणिपूर हिंसाचारा बद्दल चार जणांना अटक केली आहे. मणिपूर सरकारच्या आदेशावरून सीबीआयनं ऑगस्ट महिन्यात याप्रकरणी दोन गुन्हे दाखल केले होते. याप्रकरणी दाखल करण्यात

आलेल्या गुन्ह्यांमधल्या सर्व आरोपींना सीबीआयनं आतापर्यंत अटक केल्याची माहिती मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंग यांनी दिली आहे. अटक केलेल्या आरोपींना गुवाहाटी न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे यातल्या दोन अल्पवयीन मुलांना जिल्हा बाल संरक्षण अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिलं आहे. लोकांनी मणिपूर हिंसाचाराबाबत अफवा पसरवू नयेत, असं आवाहन सिंग यांनी केलं आहे.

**<><><><><>**

भारत-अमेरिका संबंध नवीन उंचीवर घेऊन जाण्यात परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची मोठी भूमिका असल्याचं अमेरिकी सरकारमधल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. दोन्ही देशातले संबंध त्यांनी नव्या उंचीवर नेले आहेत. भारताचे अमेरिकेतले राजदूत तरणजित सिंग संधू यांनी काल आयोजित केलेल्या विशेष भोजनप्रसंगी अमेरिकी प्रशासनातले वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अमेरिकेचे सर्जन जनरल विवेक मूर्ती, उप परराष्ट्र मंत्री रिचर्ड वर्मा, राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या सल्लागार नीरा टंडन यांचा यात समावेश होता.

**<><><><><>**

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आज ३ कांस्य पदकांची कमाई केली. महिलांच्या दुहेरी टेबल टेनिस स्पर्धेत मुखर्जी भगिनींनी आज ऐतिहासिक कांस्यपदक पटकावलं. ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी यांना उत्तर कोरियाच्या सुयॉन्ग चा आणि सुगयोंग पाक यांच्याकडून उपांत्य फेरीत ३ विरुद्ध ४ गेमने पराभव पत्करावा लागला. या दोघींनी महिला दुहेरीत पदक मिळवत आशियाई स्पर्धेत महिलांच्या दुहेरी टेबल टेनिस प्रकारात देशासाठी पहिल्यांदाच पदक पटकावण्याची कामगिरी केली आहे. आजच्या विजयांसह

भारताची एकूण पदकसंख्या ५५ झाली असून यात १३ सुवर्ण, २१ रौप्य आणि २१ कांस्य पदकांची समावेश आहे. भारतानं पदकतालिकेत आपलं चौथं स्थान कायम राखलं आहे.

भारतीय पुरुष आणि महिला खेळाडूंनी आज 3 हजार मीटर वेगवान स्केटिंग रिले स्पर्धेत आपापल्या गटात कांस्यपदक मिळवलं.

या स्पर्धेत आज नवव्या दिवशी भारतीय महिला कबड्डी संघाचा सामना चिनी तैपेईच्या संघा बरोबर होणार आहे.

भारताच्या तजिंदर पाल सिंग तूरने गोळा फेक स्पर्धेत काल सुवर्णपदक पटकावलं. सौदी अरेबियाच्या मोहम्मद दौडाला मागे टाकत त्यानं हा विक्रम नोंदवला. तजिंदर पालनं वीस पूर्णांक 36 मीटर अंतरावर गोळा फेकत सुवर्णपदकाला गवसणी घातली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तजिंदर पाल सिंग तूर याचं गोळा फेक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. तसंच त्यांनी कार्थिका जगदीश्वरन, हिरल साधू आणि आरथी कस्तुरी राज या महिला स्केटिंग संघाला विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत. केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनीही स्केटिंगच्या संघाचं कौतुक केलं आहे. बीडच्या अविनाश साबळेनं काल सुवर्णपदक पटकावलं.

//<><><><><><>//